**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ । अंक २७६ । सोमवार ३ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


### एमपीएससी पेपर फुटी, एमएसटी-सीईटी घोटाळा, टीईटी रद्द करण्यासाठी

# संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकारी कार्यालय समोर ठिय्या आंदोलन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एनईई पेपर फुटी प्रकरणाने संपूर्ण भारतात वातावर तापलेले असताना महाराष्ट्रात मार्च २०२६ मध्ये झालेल्या औषधं निरीक्षक या पदासाठी एमपीएससीने परीक्षा घेतली असून या परीक्षेचा पेपर फुटला असल्याची चर्चा समाज माध्यमात सुरू असून या परीक्षेचे काही प्रश्न बाहेर आले आहेत व त्याचे स्क्रीन शॉट समाज माध्यमात व्हायरल झाले आहेत. ही गंभीर घटना असून या प्रकरणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून मुळा पासून तपास करून दोषींना कडक शासन करण्याची मागणी संभाजी ब्रिगेड निवेदनात केली आहे.




परीक्षा ही ऑनलाईन स्वरूपात घेतली जाते व या वर चे नियंत्रण असले तरी परीक्षा नाव नोंदणी करणे, परीक्षा केंद्र निश्चित करणे, परीक्षा हॉल तिकीट वितरित करणे, परीक्षा घेणे व निकाल तयार करून तो कडे सुपूर्द करण्याचे महत्वपूर्ण काम खाजगी आस्थापना अर्थात खाजगी कंपनी कडे दिलेले आहे ही बाब अत्यंत गंभीर असून येथे हवे परीक्षा केंद्र देणे, मार्क वाढणे, परीक्षेत फेरफार करणे, आर्थिक तडजोडी करून गोरगरीब व हुशार विद्यार्थ्यांवर अन्याय केला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे, तसेच या परीक्षेचा निकाल पर्सेंटेज ऐवजी पर्सेंटाइल मध्ये जाहीर केला जातो हा निकाल खरा नसून ही विद्यार्थी व पालकांची फसवणूक आहे ■ पान ४ वर

# चिक्की पॅकेटमध्ये जिवंत अळ्या

**। अहिल्यानगर शहरातील धक्कादायक प्रकार**
**। अन्न औषध प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील माळीवाडा बसस्थानक परिसरात विक्रीस असलेल्या चिक्कीच्या पॅकेटमध्ये चक्क जिवंत अळ्या आढळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून. खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणाऱ्या या प्रकारामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



### पॅकेट उघडताच अळ्या बाहेर...

मिळालेल्या माहितीनुसार, बाबासाहेब आव्हाड यांनी माळीवाडा बसस्थानकाजवळील एका हातगाडीवरून चिक्कीची तीन पॅकेट खरेदी केली. मात्र, पॅकेट उघडताच त्यामध्ये मोठ्या प्रमाणात जिवंत अळ्या फिरताना दिसून आल्या. हा प्रकार पाहून ग्राहक हादरला. याबाबत हातगाडी चालकाला विचारणा केली असता, संबंधित चिक्कीचा माल माळीवाडा परिसरातील एका किराणा दुकानातून आणल्याचं त्याने सांगितलं.

### बुरशी लागलेले, निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थांची खुलेआम विक्री

या घटनेमुळे शहरात विक्रीस असलेल्या खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी मुदतबाह्य, बुरशी लागलेले तसेच निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ खुलेआम विकले जात असल्याची चर्चा असून, संबंधित यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून नियमित तपासणी आणि प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याची भावना व्यक्त होत आहे

## चांदा येथील बनावट दारूच्या कारखान्याचा पर्दाफाश; पावणेबारा लाखांचा मुद्देमाल जप्त

**एलसीबीच्या पथकाची धडाकेबाज कारवाई, चौघांवर गुन्हा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने नेवासा तालुक्यातील चांदा येथील बनावट दारूच्या कारखान्याचा पर्दाफाश केला असून, या धडाकेबाज कारवाईत एकूण सुमारे पावणेबारा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना, ■ पान ४ वर

## पाथर्डीत एलसीबीचे अवैध गुटख्यावर छापे

**साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त, ५ जणांवर गुन्हे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाथर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीरपणे सुगंधी तंबाखू, मावा व गुटख्याची विक्री करणाऱ्या तीन वेगवेगळ्या ठिकाणी टाकलेल्या छाप्यात एकूण ४ लाख ४५ हजार १८१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, तर ५ आरोपींविरुद्ध तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अंबादास गंगाधर गिरी (वय ३३, रा.



अकोला, पाथर्डी), आदित्य गणेश भस्करे (वय २२, रा. आकारबा गल्ली, पाथर्डी), संतोष प्रताप इधाटे (वय ३९, रा. नाथनगर, पाथर्डी), ■ पान ४ वर

## नगर शहरातील सराईतांची टोळी एक वर्षासाठी हद्दपार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने शरीराविरुद्ध व मालाविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या तीनजणांच्या एका सराईत टोळीला नगर जिल्ह्यातून एक वर्षाच्या कालावधीसाठी हद्दपार केले आहे.

टोळीप्रमुख सरवर अस्लम शेख उर्फ भिम्या (रा. झेंडीगेट, सुभेदार गल्ली), तसेच सदस्य रेहान रऊफ शेख (वय २८, रा. नालसाब चौक, सुभेदार गल्ली) व मुजम्मील शहीद शेख (वय २६, रा. जिलाणी बिल्डींग, नगर) अशी त्यांची नावे आहेत. ■ पान ४ वर


जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित

# श्री आनंदऋषिजी हॉस्पिटल अँण्ड हार्ट सर्जरी सेंटर, अहिल्यानगर

N.A.B.H. (Full Accredited) & ISO 9001:2015 Hospital
अहिल्यानगर जिल्ह्यातील २६० बेडचे अद्ययावत एकमेव N.A.B.H. मान्यताप्राप्त रुग्णालय

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त आयोजित

तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली

## भव्य विविध मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**दि. ०५ ते २८ ऑगस्ट २०२६**
**रोज सकाळी १० ते दुपारी २**

| वार/दिनांक | शिबीरांचे नांव | तज्ञ डॉक्टर्स |
|---|---|---|
| ०५ ऑगस्ट २०२६ बुधवार | **जनरल सर्जरी शिबीर–** * सवलतीच्या दरात जनरल शस्त्रक्रिया शिबीर - अॅपेंडीक्स (Interval) रू. 10,000/- इंगवायनल हार्निया रू. 10,000/- हायड्रोसिल रू. 4000/- (औषध खर्च वेगळा) | जनरल सर्जन - डॉ. प्रविण मुनोत, डॉ. विवेक भापकर डॉ. भास्कर जाधव, डॉ. महेश घुगे, |
| ०७ ऑगस्ट २०२६ शुक्रवार | **ब्लडप्रेशर, डायबेटीज् व इतर सर्व आजारांवर निदान व चिकित्सा** साथीचे आजार व सर्व रोग निदान शिबीर. | एम.डी. मेडिसीन - डॉ. वसंत कटारिया, डॉ. गजेंद्र गिरी, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ. स्वप्नील शिंदे |
| ०८ ऑगस्ट २०२६ शनिवार | **दंतरोग शिबीर** मेटलकॅप 1000/- ; सिरॅमिक कॅप 2000/-, 2500/- ; रुट कॅनल 2100/- ते 3000/- ; दात साफ करणे (Scaling) 500/- पासुन पुढे.. ; दातामध्ये सिमेंट भरणे 500/- पासुन पुढे.. ; दातांची कवळी बसवणे - (4 Types Denture) 8,000/-, 10,000/-,14,000/- 20,000/- ; इम्प्लांट 13500/- पासून सुरु ; * औषध खर्च वेगळा | डॉ. अर्पणा पवार, डॉ. स्वराज ठोले, ऑर्थो डेन्टीस्ट - डॉ. अश्विनी बालगुडे, बालरोग डेन्टीस्ट - डॉ. तृप्ती डुंगरवाल, डॉ. प्रणव डुंगरवाल |
| ०९ ऑगस्ट २०२६ रविवार | **भव्य हृदयरोग तपासणी व हृदय शस्त्रक्रिया शिबीर –** बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजवणे. लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया व अँन्जिओप्लास्टी व सर्व शस्त्रक्रिया महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत केल्या जातील. **अँन्जिओग्राफी रू. 3000/- मध्ये** | कार्डीयाक सर्जन - डॉ. श्रीरंग रानडे, डॉ. इम्रान पटेल, डॉ. सुमित अगस्थी एम.डी.मेडिसीन - डॉ. वसंत कटारिया, डॉ. विनोद चिंधे कार्डिओलॉजीस्ट- डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. अमित भराडिया कार्डीयाक अॅनेस्थेटीस्ट- डॉ. विनय छल्लाणी, एम.डी.मेडिसीन - डॉ. गजेंद्र गिरी, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ. स्वप्नील शिंदे |
| १० ऑगस्ट २०२६ सोमवार | **दुबिर्णीद्वारे शस्त्रक्रिया (बीनाटाका)–** * लॅप्रोस्कोपी पोटावरील जागेचे, बेंबीचे ऑपरेशनच्या जागेतील (Inguinal) हार्नियाची शस्त्रक्रिया रू. 10000/- * पित्ताशय काढणे रू. 15000/- * स्त्रीयांची गर्भाशयाची पिशवी काढणे (हिस्ट्रेक्टॉमी)रू. 10000/- * स्टॅपलर/लेझर पाईल्स शस्त्रक्रिया रू. 15000/- * अॅपेडिक्स ऑपरेशन रू. 4000/- लॅप्रोस्कोपी * स्त्रीयांचे बिजांडपोशावरील गाठी शस्त्रक्रिया रू. 5000/- * स्त्रीयांचेव्यंधत्वाची तपासणी करीता गर्भनलिकची ट्युबल पेटेन्सी रू. 2000/- * लॅप्रोस्कोपी स्त्रीयांचे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया रू. 3000/- टिप : वरील शस्त्रक्रिया पॅकेजेस मध्ये औषध व आय.सी.यु. चा खर्च वेगळा असेल. | जनरल सर्जन, लॅप्रोस्कोपीक सर्जन - डॉ. प्रविण मुनोत, डॉ. भास्कर जाधव, डॉ. महेश घुगे स्त्री रोग तज्ञ - डॉ. रविंद्र मुथा, डॉ. कृतिका पाटील, डॉ. निलोफर धानोरकर |
| ११ ऑगस्ट २०२६ मंगळवार | **कान, नाक, घसा तपासणी शिबीर –** स्पिच थेरपी तपासणी व मार्गदर्शन - ऑडिओमेट्री सुविधा उपलब्ध. | कान,नाक,घसा,तज्ञ - डॉ. सुकेशिनी गाडेकर, डॉ. अतुल तुपे, डॉ. सुरज कर्डिले |
| १२ ऑगस्ट २०२६ बुधवार | **पोटविकार तपासणी शिबीर –** | पोटविकार तज्ञ - डॉ. राजेंद्र गुंजाळ, डॉ. रोहित वाघ |
| १३ ऑगस्ट २०२६ गुरुवार | **मेंदुविकार शिबीर** न्युरोलॉजी - डोके दुखी, अपस्मात, पॅरेलिसिस/पक्षाघात, कंबरदुखी, नसांचे विकार, स्नायुंचे विकार, मेंदुचा जंतु संसर्ग, मेंदुज्वर, स्मृतीभ्रंश इ. आजारांवर उपचार व मार्गदर्शन - ईईजी, ईएमजी, एनसीव्ही इ. तपासण्या ५०% सवलतीच्या दरात केल्या जातील. न्युरोसर्जन : मेंदु, मणके व मज्जारज्जू संबंधीत आजार तपासणी शिबीर ट्रॉमा सर्जरी, मेंदुतील रक्तस्त्राव, स्लीपडिस्क (मणक्यातील चकती सरकणे, झटके येणे इत्यादीवर उपचार व शस्त्रक्रिया) पेडियाट्रिक न्युरोलॉजी, लहान मुलांमधील फिट, मेंदुविकार मतिमंदता, गतिमंदता, स्वमग्नता (ऑटिझम), आनुवंशिक आजार, अतिचंचलपणा, इ. आजारांवर | न्युरोलॉजीस्ट - डॉ. अद्वैत गिते, डॉ. वैशाली कदम लहान मुलांचे मेंदुविकार तज्ञ - डॉ. स्नेहा म्हस्के |
| १४ ऑगस्ट २०२६ शुक्रवार | **किडनीचे आजार** अंगावर सुज येणे, लघवी कमी/ लाल होणे, किडनी जंतु संसर्ग, डायलेसिस इ. उपचार. किडनी ट्रान्सप्लांट * महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत डायलेसिस मोफत केले जातील. | नेफ्रोलॉजीस्ट - डॉ. गोविंद कासट, फिजिशियन - डॉ. प्राजक्ता पारधे |
| १७ ऑगस्ट २०२६ सोमवार | **स्त्रीरोग, गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबीर व मार्गदर्शन–** * दुर्बिणीद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयाची पिशवी योनीद्वारे काढण्याची शस्त्रक्रिया रू. 10000/-पॅकेज * सिझेरियन रू. 10000/-* शिबीरात सहभागी होणाऱ्या गर्भवती मातांना सोनोग्राफी,रक्त, लघवी इ. तपासण्या ५०% सवलतीच्या दरात केल्या जातील. (शिबीरापासून पुढे १ महिन्यापर्यंत केल्या जातील) * शिबीरात सहभागी होणाऱ्या गर्भवती मातांना बाळंतपण वेळी होणाऱ्या बिलात ५०% सवलत दिली जाईल. मात्र सवलतीचे कार्ड असणे आवश्यक आहे. | स्त्री रोग तज्ञ - डॉ. रविंद्र मुथा डॉ. कृतिका पाटील, डॉ. निलोफर धानोरकर |
| २१ ऑगस्ट २०२६ शुक्रवार | **बालरोग तपासणी शिबीर –** नवजात शिशुंच्या सर्व आजारांवर निदान व उपचार. लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, हर्निया, डायफ्रामॅटिक हर्निया, फायमोसीस, हायड्रोसील, अर्नाडसेंन्डेड टेस्टीस व इतर | नवजात शिशु व बालरोग तज्ञ - डॉ. निखीलकुमार गुट्टे, बालरोग तज्ञ - डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दीपी अग्रवाल, डॉ. सचिन तोडमल, पिडियाट्रिक सर्जन - डॉ. रुपेश सिकची |
| २२ ऑगस्ट २०२६ शनिवार | **कॅन्सर तपासणी शिबीर–** घशाचा, फुफ्फुसाचा, आतड्याचा, तोंडाचा इ. **स्त्रियांचे कॅन्सर तपासणी शिबीर –** मॅमोग्राफी मशिनद्वारे स्त्रियांच्या स्तनाचा कॅन्सर शिबीराचे वेशिष्ट्ये : * स्त्रियांच्या गर्भपिशवीच्या कॅन्सर व निदानाकरिता सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी. सर्व प्रकारचे कॅन्सर उपचार, ब्रेकिथेरपी, ब्लड कॅन्सर, पॅलीयेटीव्ह कॅन्सर उपचार,सिम्टोमॅटीक कॅन्सर उपचार, लहान मुलांचे कॅन्सर उपचार इ.सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध. **मॅमोग्राफी तपासणी रू. 100/- मात्र दरात केली जाईल.** | कॅन्सर सर्जन : डॉ. अनिकेत शिंदे, कॅन्सर फिजिशियन - डॉ. तुषार मुळे कॅन्सर विकार तज्ञ : डॉ. लिझा बलसारा, फिजिशियन - डॉ. गजेंद्र गिरी, स्त्रीरोग तज्ञ - डॉ. रविंद्र मुथा, डॉ. कृतिका पाटील, डॉ. निलोफर धानोरकर रेडिओलॉजिस्ट - डॉ.मितेश कटारिया,डॉ.भक्ती फाळके डॉ.सोनाली सोलट, डॉ.निखीता जैन (कटारिया) पॅथोलॉजिस्ट : डॉ मुकुंद उंडे, डॉ. सारिका झरेकर, डॉ. जिज्ञासा मुनोत मायक्रोबायोलॉजिस्ट : डॉ. नरेंद्र पाटील |
| २३ ऑगस्ट २०२६ रविवार | **मोफत नेत्र रोग तपासणी– अल्पदरात मोतिबिंदु शस्त्रक्रिया शिबीर** शिबिराचे ठिकाण : आनंदऋषिजी नेत्रालय, भगवान महावीर भवन नाव नोंदणीसाठी संपर्क : 8686401515 | नेत्ररोग तज्ञ - डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. अशोक महाडीक डॉ. संदिप राणे, डॉ. प्रतिक कटारिया, डॉ. विशाल तांबे, डॉ. किरण शिंदे, डॉ. नेहा भरडिया, डॉ. केतन राठोड, डॉ. विवेक पाऊलबुधे, डॉ. नलिनी गिते, डॉ. कौस्तुभ घोडके डॉ. निरंजन पेहरे, डॉ. पुनम लंकेश्वर व इतर नेत्रतज्ञ |
| २४ ऑगस्ट २०२६ सोमवार | **एंडो-युरोलॉजिकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय) स्टोन शस्त्रक्रिया –** * प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरुष वंध्यत्व समुपदेशन, मूल्यमापन आणि व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मूल्यमापन आणि व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मार्गातील विकार, मूत्रमार्ग, मूत्राशय, प्रोस्टेट, पुरुषांचे जननेंद्रिय, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन * महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जातील. | मूत्रविकार शल्यचिकित्सक - डॉ. अजित दरंदले, डॉ. अमेय सांगळे, डॉ. संकेत काळपांडे |
| २५ ऑगस्ट २०२६ मंगळवार | **अस्थिरोग तपासणी मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया व फिजिओथेरपी शिबीर–** संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण/संपूर्ण खुबा प्रत्यारोपण रु. 65,000 पासुन पुढे- (गुणवत्तापूर्वक इन्प्लांटसह) औषध खर्च वेगळा. गुडघेदुखी (TKR पुनर्वसन): Knee pain (Total Knee Replacement Rehabilitation) गोठलेला खांदा (फ्रोजन शोल्डर): Frozen shoulder मानदुखी: Neck pain पाठदुखी: Back pain फ्रॅक्चर नंतरचे पुनर्वसन: Post fracture rehab बेल्स पाल्सी आणि चेहऱ्याचा कमकुवतपणा : Bell's palsy & facial weakness पक्षाघात (पॅरालिसिस) उपचार: Paralysis treatment | अस्थीरोग तज्ञ - डॉ. विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे स्पाईन सर्जन - डॉ. अमित सुराणा, डॉ. श्रीकांत दलाल डॉ. भरत जगताप फिजिओथेरपिस्ट - डॉ. आराधना अरवडे, डॉ. अभय साठे, डॉ. नितीनकुमार |
| २८ ऑगस्ट २०२६ शुक्रवार | **प्लॅस्टिक सर्जरी शिबीर–** लहान मुलांचे जन्मजात हातांचे समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणाऱ्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा, हातांच्या नस संबंधित आजार, जखमा, दुभंगलेले ओठ, तुटलेले कान, चेहऱ्यावरील व्रण इ. तोंड, गाल, ओठ, जीभ, जबडा, मान, सायनस आणि लाल ग्रंथीच्या साध्या व कर्करोगाच्या गाठीचे निदान व उपचार, तोंडात होणाऱ्या लाल, पांढरे चट्टे, तिखट व मसालेदार अन्न खाण्यास अडचण येणे, तोंडाच्या व्रण यावर औषधोपचार.. स्माईल ट्रेन प्रोजेक्ट अंतर्गत मोफत शस्त्रक्रिया | प्लॅस्टिक सर्जन : डॉ. आदित्य दमानी डॉ. मृदुला मुळे |

design : Yashwant # 98223 33823

**महावीर भवन** रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे करिता अल्पदरात निवासाची व्यवस्था उपलब्ध. भोजन रु. 35/- मात्र

**एम.आर.आय.** रू 2500/- रात्री 1.00 ते पहाटे 5.00 या वेळेत एम.आर.आय. केल्यास रु. 750/- ची सुट : संपर्क : 9404297411

**सिटीस्कॅन** रू. 1250/- संपर्क : 9404299911

24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक

**डिजिटल एक्सरे** रू. 250/- **सोनोग्राफी** कलर प्रिंट व रिपोर्टसह रू. 950/- संपर्क : 9405271878

होम ब्लड सॅम्पल कलेक्शन मो. नं. 9373807842

हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
**श्री आनंदऋषिजी हॉस्पिटल अँण्ड हार्ट सर्जरी सेंटर, अ.नगर**
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१.
फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५, मो. ९४०४३९९९११

## दै. आकर्षण निवडक

### हरिश्चंद्रगड परिसरात हिंद सेवाच्या बालचमुंनी केली चक्क भात लावणी



अहिल्यानगर - दररोज शाळेच्या मध्यान भोजनात किंवा आपल्या दैनंदिन आहारात असणारा तांदुळ कसा पिकवतात? याची प्रत्यक्ष अकोल्यातील हरिश्चंद्रगड परिसरात वारुंघुशीला जाऊन भाताच्या चिखलणीच्या शेतात विदयार्थ्यांनी भात लावणीचा आनंद घेतला.इंद्रायणी वानाच्या भाताच्या रोपाच्या जुडया हातात घेत ओळख करुन घेतली.शेतात प्रथम शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे यांनी ट्रॅक्टर चालवत लावणीसाठी चिखलणीचे शेत तयार केले. १०-१० मुलांचे गट करुन शेतात मुले उतरली भात लावणीची गाणी म्हणत भाताच्या रोपाची लावणी केली. चिखलणीच्या शेतात मऊ मऊ चिखलात पडणारी चिमुकल्यांची पाऊले,मधुन मधुन येणा-या पावसाच्या सरी,अशा चिंब वातावरणात मोठया उत्साहात भात लावणीत विदयार्थी व शिक्षक रममान झाले.शेतक-यांचे कष्ट विदयार्थ्यांनी अनुभवले.भाताची मिल पाहून तांदळाची माहिती घेतली. उंच उंच डोंगराला मिठी मारणारे ढगांचे पुंजके, फेसाळणारे पाण्याचे धबधबे हिरवगार शालू परिधान केलेली राने पाहून निसर्गावरील अनेक कविता शिक्षकांसमवेत मुलांनी गायल्या.

### शिर्डीत साई आश्रया अनाथालयातील मुलांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप



अहिल्यानगर- भारतीय लहुजी सेनेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिर्डीतील साई आश्रया अनाथालयात अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष समीर वीर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सालाबादप्रमाणे यंदाही अनाथ मुलांना शैक्षणिक साहित्य, मिष्टान्न भोजन आणि फळांचे वाटप करत अनोख्या पद्धतीने जयंती साजरी केली.याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते, माजी उपनगराध्यक्ष विजयराव कोते, माजी उपनगराध्यक्ष सुजित गोंदकर,उपनगराध्यक्ष मंगेश त्रिभुवन,नगरसेवक बापू ठाकरे यांसह मान्यवरांनी उपस्थिती लावत प्रतिमेचे पूजन केले व समीर वीर यांच्या वर्षानुवर्षे जयंतीनिमित्त अविरत चालत आलेल्या या अनोख्या उपक्रमाचे कौतुक केले.

# शिक्षण ही सर्वात मोठी गुंतवणूक, तर शाळा मुलांचे भविष्य घडविणारी केंद्रे – आनंद भंडारी

**निरंजन सेवाभावी संस्थेकडून ७०० गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व; विद्यार्थ्यांना वर्षभराची शैक्षणिक किटचे वितरण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्हा परिषदेच्या शाळा आजही अनेक खाजगी शाळांपेक्षा अधिक दर्जेदार शिक्षण देत आहेत. त्यामुळे या शाळांचे अस्तित्व टिकविणे ही काळाची गरज असून, त्या मॉडेल स्कूल म्हणून विकसित करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना आणि दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा. जिल्हा परिषद शाळा टिकल्या नाहीत तर शिक्षणाचे बाजारीकरण होईल आणि त्याचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांना बसेल. त्यामुळे गावागावातील शाळांची जबाबदारी स्वीकारून त्यांना सक्षम करण्यासाठी समाजाने पुढे यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले.

निरंजन सेवाभावी संस्थेच्या वतीने १४ वर्षांपासून संस्था गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक पालकत्वाची संकल्पना राबवत असून, यंदा तब्बल ३ हजार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पालकत्वाचा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यात आला आहे. तसेच अहिल्यानगर मधील जिल्हा परिषद व इतर शाळांमधील गरजू घटकातील ७०० विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी आवश्यक शैक्षणिक किटचे वितरण करुन शैक्षणिक पालकत्व उपक्रम राबविण्यात आला. यावेळी भंडारी बोलत होते. माऊली सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास उद्योजक अनुराग धुत, उदयोजक राघवेंद्र बिहाणी, उदयोजक कमलेश झंवर , जिल्हा परिषद सीएसआर समितीचे रमेश कासार निरंजन संस्थेचे अतुल डागा, जयेश कासट, स्वप्निल कुलकर्णी , राहुल झंवर , मुकुंद धुत, सुमित चांडक, राहुल ओझा, दिनेश भाटिया, अभिजीत बिहानी, योगेश सिकची, पियुष झंवर, गोविंद दरक, सिद्धार्थ झंवर,पवन बंग , सौ प्राजक्ता डागा , रोहन मंत्री, प्रसाद बजाज, वैभव जाधव यांच्यासह संस्थेचे सदस्य, शालेय शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे आनंद भंडारी म्हणाले की, निरंजन सेवाभावी संस्थेने सामाजिक उत्तरदायित्व ओळखून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली आहे. प्रत्येकजण स्वतःच्या कुटुंबासाठी आयुष्य जगतो; मात्र काही व्यक्ती समाजाचाही विचार करतात. अशा संस्थांमध्ये निरंजन सेवाभावी संस्थेचा अग्रक्रम असून, संस्थेने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पालकत्वाची भूमिका स्वीकारत एका जबाबदार पालकाप्रमाणे त्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक किटमध्ये टोपीपासून छत्रीपर्यंत सर्व आवश्यक शैक्षणिक साहित्याचा समावेश करण्यात आला आहे. शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांसाठी आज अनेक दाते पुढे येत आहेत, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. आमच्या शिक्षणाच्या काळात परिस्थिती अत्यंत कठीण होती. चप्पल नव्हती, शर्ट-पॅन्ट फाटलेले असायचे, अशा परिस्थितीत शिक्षण पूर्ण केले. मात्र आजच्या विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून त्यांना वेळेवर मदत केली जात आहे, ही बाब अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

# बुगेवाडीत एक कोटी रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील बुगेवाडी येथे सुमारे एक कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. रस्ते, पायाभूत सुविधा व ग्रामविकासाला चालना देणाऱ्या या विकासकामांमुळे बुगेवाडीच्या सर्वांगीण प्रगतीला नवे बळ मिळणार आहे.

यावेळी आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, ''विकास हीच आपली राजकारणाची खरी ओळख आहे. गावागावांत मूलभूत सुविधा निर्माण करून नागरिकांचे जीवनमान उंचावणे, प्रत्येक वस्तीपर्यंत दर्जेदार रस्ते, पाणी, वीज आणि आवश्यक सुविधा पोहोचविणे हेच माझे ध्येय आहे. मतदारसंघातील कोणतेही गाव विकासापासून वंचित राहणार नाही. जनतेने दाखविलेल्या विश्वासाला न्याय देत विकासाची ही वाटचाल भविष्यातही अधिक वेगाने सुरू राहील,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या विकासकामांमुळे बुगेवाडीसह परीसरातील दळणवळण अधिक सुलभ होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून भविष्यातही बुगेवाडीसह संपूर्ण मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, नगरसेवक अशोक चेडे, शहराध्यक्ष राजेंद्र औटी, सुनील गाडगे, नगरसेवक नवनाथ सोबले, शहरप्रमुख कविता औटी, सखाराम बुगे, रामदास कावरे, विजय कावरे, सुनिता सोबले, कुंडलिक कावरे, साहेबराव बुगे, ठकाराम बुगे, विठ्ठल कावरे, सिताराम बुगे, शिवाजी काळे, रोहीदास भुसारे, मंगेश कावरे, प्रतिभा कावरे, संतोष थोरात, रामदास वाळुंज, सागर वैद्य, सोपान कावरे, कोंडीभाऊ थोरात, शरद कावरे, प्रशांत कावरे, मयुर कावरे, यश बुगे, बाळासाहेब सोनवणे, चिन्मय कावरे, शांताराम तराळ, प्रसाद बुगे, प्रतिक चत्तर, भानुदास कावरे, संपत वारे, गणेश बुगे, सखाराम कावरे, धनाजी थोरात, रामदास थोरात, भाऊसाहेब बुगे, सुनील कावरे, इंजि. प्रताप अंबुले, फारुख शेख, नागेश रोहोकले यांच्यासह अनेक मान्यवर, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारनेरमध्ये निर्भया पथक स्थापन करा

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे यांचे पोलीस प्रशासनाला निवेदन; विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षेवर भर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे यांनी विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पारनेर पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र निर्भया पथक स्थापन करून ते प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पारनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर केले.

महिला सक्षमीकरण, सामाजिक प्रश्नांबाबत सातत्याने पाठपुरावा आणि महिलांच्या हक्कांसाठी सक्रियपणे काम करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे यांनी ही मागणी पुढे आणली आहे. तालुक्यातील विद्यार्थिनी, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. निवेदनात पारनेर पोलीस स्टेशन अंतर्गत निर्भया पथकाची तातडीने स्थापना करून त्याचे नियमित गस्त व जनसंपर्क उपक्रम राबविण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच तालुक्यातील प्रमुख चौक, सार्वजनिक ठिकाणे, शासकीय कार्यालये, बसस्थानके आणि गर्दीच्या परिसरांमध्ये निर्भया पथकाची माहिती, संपर्क क्रमांक आणि कार्यपद्धती दर्शविणारे माहितीफलक व बॅनर्स लावण्यात यावेत, असेही नमूद करण्यात आले आहे.

महिलांमध्ये आणि विद्यार्थिनींमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी माहितीपत्रकांचे वितरण करण्यात यावे, तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये महिला सुरक्षेसंदर्भात मार्गदर्शनपर कार्यक्रम, जनसंवाद उपक्रम, प्रबोधनपर सत्रे आणि कायदेशीर हक्कांविषयी जनजागृती मोहीम राबविण्यात यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

याशिवाय फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप, इन्स्टाग्राम यांसारख्या सोशल मीडिया माध्यमांद्वारे निर्भया पथकाची माहिती, संपर्क क्रमांक आणि नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सेवांचा सातत्याने प्रचार-प्रसार करण्यात यावा, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळू शकेल, असेही रावडे यांनी म्हटले आहे.

निवेदन सादर करताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती तालुकाध्यक्षा अपर्णा खामकर, महिला शहराध्यक्षा कविता औटी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होत्या. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**सध्या विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला आहे. महिलांना निर्भयपणे शिक्षण, नोकरी आणि दैनंदिन व्यवहार करता यावेत यासाठी प्रभावी सुरक्षा यंत्रणा आवश्यक आहे. पारनेर तालुक्यात निर्भया पथकाची स्थापना झाल्यास महिलांना तातडीची मदत मिळेल, तसेच छेडछाड, अत्याचार आणि महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यास मदत होईल. पोलीस प्रशासनाने या मागणीची सकारात्मक दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी आमची अपेक्षा आहे.**

**सुषमा रावडे**
**(तालुकाध्यक्षा : राष्ट्रवादी महिला काँग्रेस, पारनेर)**

# डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानाचा शुभारंभ; जनजागृतीमुळे डेंगू रुग्णसंख्येत लक्षणीय घट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका आणि आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने श्रमिकनगर येथे 'डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानाचा' शुभारंभ महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर यांच्या हस्ते करण्यात आला. अभियानांतर्गत परिसरातील पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली तसेच नागरिकांमध्ये डेंगू प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी बोलताना सभापती दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, आरोग्य हीच माणसाची खरी संपत्ती आहे. धकाधकीच्या जीवनात अनेकजण स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि स्वच्छतेच्या सवयी अंगीकारल्यास अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांकडे वळून शारीरिक तंदुरुस्ती राखावी, असे आवाहन त्यांनी केले.

त्या पुढे म्हणाल्या की, डेंगू हा अत्यंत जीवघेणा आजार असून त्यावर उपचारापेक्षा प्रतिबंध अधिक महत्त्वाचा आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून आणि परिसरापासून स्वच्छतेची सुरुवात करून साचलेले पाणी तातडीने नष्ट करावे. एडिस डासांची उत्पत्ती होणार नाही, यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक आहे. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून दोन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियानामुळे शहरातील डेंगू रुग्णसंख्येत मोठी घट झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, नगरसेवक मनोज दुल्लम, नगरसेवक करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, नगरसेविका रोशनी त्रिंबके, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, डॉ. धनंजय वारे, डॉ. पद्मा कुलकर्णी, विद्या एकलदेवी, श्याम पंगा, रोशनी सूर्यवंशी, शशिकांत गोरे, सोनाली मेहत्रे, डॉ. वृषाली आरु, डॉ. आरती ढापसे, आरोग्य सेविका, आशा सेविका, विद्यार्थी, पालक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी सांगितले की, महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून दोन वर्षांपूर्वी डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियान सुरू करण्यात आले. पावसाळ्यात डेंगूचा प्रादुर्भाव वाढत असल्याने नागरिकांमध्ये जनजागृती, पाणीसाठ्यांची तपासणी, डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण आणि मोफत आरोग्य तपासणी यांसारख्या उपाययोजना सातत्याने राबविण्यात येत आहेत.

महापालिकेने ३० आरोग्य पथके तयार केली असून प्रत्येक शनिवारी शहरातील विविध भागांत घरोघरी जाऊन सुमारे आठ हजार नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे काम केले जात आहे. अभियानाच्या पहिल्या वर्षी शहरात ७८ डेंगू रुग्ण आढळले होते. दुसऱ्या वर्षी ही संख्या १८ वर आली, तर यावर्षी जुलैअखेरपर्यंत केवळ ३ रुग्ण आढळले आहेत. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे डेंगूमुक्त अहिल्यानगर ही लोकचळवळ बनल्याचे त्यांनी सांगितले.

नगरसेवक करण कराळे म्हणाले की, महापालिकेने सुरू केलेले डेंगूमुक्त अहिल्यानगर अभियान हे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत कौतुकास्पद आहे. डासांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी फवारणी, पाणीसाठ्यांची तपासणी आणि आरोग्यविषयक जनजागृती अधिक व्यापक स्वरूपात राबवावी. डेंगूची लक्षणे दिसताच तातडीने उपचार घेतल्यास रुग्ण लवकर बरा होऊ शकतो. नागरिकांनी स्वतःची आणि परिसराची स्वच्छता राखून या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले.

## शब्दकोडे क्रमांक : २०



**आडवे शब्द :** १.वेगात असलेला ५.भाजीपाला मिळतो ते ठिकाण ८.जस-उलट लिहा ९.फॅक्टरी १०.रचना करणारा ११.पुष्पांची माळा १२.अश्मयुगातील माणूस १४.इंग्रजीत - १६.सहा दशक मिळून तयार होणारी संख्या १७.पशूंना असलेल्या पायांची संख्या १८.हिंदीत-हालचाल २०.गाईचे पिल्लू २२.कठोर मनाचा २४.गैरसोय होऊ नये म्हणून करतात ती व्यवस्था,तरतूद २५.आकाशात दाटून आलेले मेघ २७.मैत्री २८.एक गवताळ प्रदेश २९.छातीठोकपणे सांगितलेला अधिकार ३१.माहित असलेला ३२.मदान ३४. वन ३६.रुमाली रोटी चा एक प्रकार ३८.विविध तऱ्हा ३९. मनाचा ओढा ४२.पर्वत ४३. गुरुद्वारात मिळते प्रसादरूपी भोजन ४४.सातारा जिल्ह्यातील एक तालुका ४५.वेडा ४८ दोन विरुद्ध विचारांच्या मनाचा झालेला संगम ४९.आदराने वाकलेला ५०.एक भारतीय क्रिकेटपटू फक्त नाव ५१.सोबती ५२.मुंडके

**उभे शब्द :** १. बैलांना बांधण्यासाठी वापरतात २.लोखंडी सळई ३.होकार विरुद्ध ४.लाकडाचे गोदाम ६.एक फुल ७.एक भारतातील एक पर्वतरांग १० कर्ण ११.नुकसान १२.अष्ट १३.मावशीच्या नात्यातला १४.१५.घोड्यांच्या पायाला ठोकतात ती १६. वल्कल १७.चक्र १८.प्रत्येक १९.चविष्ट ३०.वचन २१.परंपरा २३. सत्य बातमी २६.गोंद २८.विड्यात वापरतात तो कठीण पदार्थ ३०.पवन ३३.रोग ३५.चपट नाकाचा ३७.आश्चर्य ३८. सुधारलेला ४०.त्वरित ४१.ग्रामीण बोलीत-स्वप्न ४४.गव्हाची पेस्ट वापरून तयार केलेला गोंद ४६.गेलेला ४७.कर ४८.एक पालेभाजी

**शब्दकोडे क्रमांक : १९ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | ग | र | | को | री | व | | वा | ग | णू | क |
| स | त | | ज | प | | स | सा | | ज | | ड |
| र | | हा | व | र | ट | | ग | ट | | का | क |
| | बे | | स | | क | र | | न | र | म | |
| प्र | का | र | | मो | ट | | दे | | वा | | ल |
| ता | र | | आ | | क | मा | व | ता | | स | ह |
| प | | सां | भा | ळ | | घा | | ल | ल | का | री |
| ग | व | ता | ळ | | ता | र | पा | | ग | ळ | |
| ड | | क्लो | | दा | ट | | ल | क | ब | | स |
| | मो | ज | दा | द | | स | खी | | ग | ह | न |
| मे | द | | द | | छा | न | | चा | | म | म |
| घ | | वि | रा | ट | | म | त | ल | बी | | रे |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### महानगरपालिका सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या कार्याध्यक्षपदी दिनकर देशमुख यांची निवड



अहिल्यानगर - येथील महानगरपालिका सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या कार्याध्यक्षपदी दिनकर देशमुख यांची निवड करण्यात आली. महानगरपालिका व नगरपालिका सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेची सभा कास्ट्राईब संघटनेच्या कार्यालयात संघटनेची बैठक नुकतीच होऊन यामध्ये दिनकरराव देशमुख यांची निवड एकमताने करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे, उपाध्यक्ष वसंत थोरात, उपाध्यक्ष मिलिंद वैद्य, चिटणीस आर. के. गावडे, खजिनदार डी. एम. डेपाळ यांच्यासह संस्थेचे सर्व कार्यकारिणी सदस्य या बैठकीस उपस्थित होते.

### ध्वनी प्रदूषण विरहित दिंडीत रंगले वि.ल.कुलकर्णी शाळेचे बाल वारकरी



अहिल्यानगर- आषाढी एकादशीनिमित्त वि. ल.कुलकर्णी प्राथमिक शाळेत भक्तिमय वातावरणात दिंडीचे आयोजन करण्यात आले.वारकरी वेशातील विद्यार्थ्यांनी टाळ,भगवे ध्वज, तुळशीची रोपे हातात घेऊन माऊली,माऊली,विठ्ठल विठ्ठल,जय हरी विठ्ठल च्या गजरात शाळेच्या परिसरातून दिंडी काढली. विद्यार्थ्यांच्या वारकरी नृत्यातून ,शिक्षकांनी गायलेल्या अभंगातून हरिनामाचा गजर करत समाजात श्रद्धा ,भक्ती आणि एकतेचा संदेश देत बाल वारकरी उत्साहात दिंडीत पायी वाट चालत होते. विठ्ठल रखुमाई,ज्ञानेश्वर माऊली,संत तुकाराम, मुक्ताबाई, संत नामदेव यांच्या वेशभूषेत असलेल्या विद्यार्थ्यांमुळे सोहळा आणखीनच नयनरम्य झाला. आषाढ सरींची पर्वा न करता या दिंडीत शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.भारदे मॅडम तसेच सर्व शिक्षक यांच्यासह संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी श्रीमती रेखे मॅडम,श्री चंद्रशेखर कुलकर्णी,श्री किरण वैकर,श्री उमेशजी रेखे,श्री महेशजी रेखे, श्री.उदयकुमार भणगे यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

### गुरुपौर्णिमेनिमित्त नवनाथ विद्यालयात वृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा संदेश

अहिल्यानगर - गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करणे, वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून देणे आणि हरित भविष्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.नवनाथ विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव सुमन कुरेल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, आप्पासाहेब कदम, तेजस केदारी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सुमन कुरेल म्हणाल्या की, ''गुरुपौर्णिमा हा आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. या दिवशी वृक्षारोपण करून निसर्गाप्रती आपली जबाबदारी पार पाडणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा.

### ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांमध्ये स्वीकृत सदस्यपदी माजी सैनिकांना संधी द्या

अहिल्यानगर - महाराष्ट्रातील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांमध्ये निवडणुकांनंतर नियुक्त करण्यात येणाऱ्या स्वीकृत सदस्यपदावर माजी सैनिकांना प्रतिनिधित्व देण्यात यावे, अशी मागणी जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास सचिवांकडे करण्यात आली आहे. प्रत्येक ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेमध्ये किमान एक स्वीकृत सदस्य म्हणून माजी सैनिकाची नियुक्ती करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे जय हिंदचे शिवाजी पालवे यांनी केली आहे.शिवाजी पालवे यांनी याबाबत सांगितले की, देशाच्या संरक्षणासाठी आयुष्याचा महत्त्वाचा काळ सीमारेषेवर घालविणाऱ्या माजी सैनिकांचा अनुभव, शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रहिताची भावना ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासकामांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे त्यांना स्थानिक प्रशासनात योगदान देण्याची संधी मिळणे आवश्यक आहे.

# धार्मिक कार्याने जीवनात सुख-शांती-समाधान लाभते - नगरसेविका पुष्पाताई बोरुडे

सावेडी, शिंदे मळा येथे संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** साधू-संताच्या आशिर्वादाने समाजात प्रेम, बुद्धी, सहिष्णुता, सात्विकता वृद्धींगत होण्यासाठी संतांनी आपले आयुष्य सत्कार्णी लावले. समाजाला सर्वांपूर्ण, संस्कारक्षम व बलशाली होण्यासाठी नामयज्ञाचे महत्व आहे. नामदेव शिंपी समाज ट्रस्टने धार्मिक क्षेत्रात दिलेले योगदान हे महत्वपूर्ण असेच आहे. या सोहळ्याने सर्वांच्या जीवनात सुख-शांती-समाधान लाभणार आहे. तसेच संत नामदेव महाराजांचे कार्य अधिक व्यापक होईल, असे प्रतिपादन नगरसेविका पुष्पाताई बोरुडे यांनी केले.

सावेडी शिंदे मळा येथील श्री संत नामदेव मंदिर येथे संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड सप्ताहाचे उद्घाटन नगरसेविका पुष्पाताई बोरुडे यांच्याहस्ते करण्यात आले यावेळी नगरसेविका वंदनाताई ताठे ,अशोकराव वाकळे ,ट्रस्टचे अध्यक्ष अशोक वडे ,उपाध्यक्ष विजय काकडे, सचिव राजू बगाडे, सहसचिव सुधीर नेवासकर ,खजिनदार कृष्णा भस्मे, दिलीप काकडे ,राजू पाटकुले, उद्धवराव बारटक्के , महेश चौकटे ,विठ्ठल वनारसे ,प्रमिला दुमाटे ,, हेमलता वडे, लक्ष्मी पाटकुले, क्रांती काकडे ,वंदना काकडे,शितल चौकटे ,सुधीर काकडे ,चंद्रकांत काकडे ,राजू लिमकर ,सौदागर सदावर्ते , निलेश चौकटे ,चंद्रकांत कल्याणकर , किरण उरुणकर ,शौनक वनारसे ,अभिषेक पाटकुले ,ओंकार चौकटे ,प्रमोद गोंदकर, शिवाजी बोंडगे, किसनराव पेहेरे , दत्तात्रय वनारसे ,सार्थक काकडे ,उपळे भागवत , आदी उपस्थित होते.

ट्रस्टच्या अध्यक्ष अशोक वडे यांनी सांगितले कि संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त सात दिवसीय धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विविध किर्तनकरांची किर्तन आयोजित केली आहे. तसेच वर्षभर ट्रस्टच्या माध्यमातून विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. समाजातील गणुवंत विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रात यश मिळविणार्या व्यक्तींचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात येतो, असे त्यांनी सांगितले.

उपाध्यक्ष विजय काकडे प्रास्तविकात म्हणाले की, आजपासून सात दिवस विविध किर्तनकरांची किर्तने आयोजित केली आहे. तसेच रविवार दिनांक ०९ रोजी दुपारी ४.३० वाजता दिंडी मिरवणुक होईल तसेच सोमवार दि १० रोजी काल्याचे किर्तन होईल. व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे हे ३७ वे वर्ष असून दिवसेंदिवस सप्ताहाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच राजेंद्र बगाडे म्हणाले की, या सप्ताह अतंर्गत रोज सकाळी दैनंदिनी आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी महिला भजनी मंडळांचे भजन, हरिपाठ, भोजन व रात्री हरी किर्तन असे सात दिवस भरगच्च कार्यक्रम आयोजित केले आहे. नगरसेविका वंदना ताठे म्हणाल्या श्री नामदेव शिंपी समाज ट्रस्टच्यावतीने या सप्ताह अंर्तगत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच या सप्ताहास आमचे सहकार्य असते. मागील ३७ वर्षापासून सातत्याने सप्ताहाची व्याप्ती वाढत चालल्याने धार्मिक क्षेत्रात चांगले कार्य यामाध्यमातून होत आहे.

# श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाची ६१ वर्षांची परंपरा गौरवास्पद – शिरीष रायते

श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाचा ६१वा वर्धापन दिन उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मुलींना उत्तम शिक्षण व संस्कार मिळावे, मुलींची शैक्षणिक प्रगती व्हावी.या उद्देशाने ही शाळा सुरू करण्यात आली आहे.या शाळेतील मुलींनी केलेली प्रगती कौतुकास्पद आहे. शाळेतील सर्व शिक्षक अत्यंत तळमळीने ज्ञानदानाचे कार्य करीत असल्याने विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेत यश मिळत आहे.श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाची ६१ वर्षाची परंपरा गौरवास्पद आहे. असे प्रतिपादन स्कूल कमिटी सदस्य प्रा.शिरीष रायते यांनी केले आहे.

हिंदसेवा मंडळ संचलित श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालय चा ६१वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले. तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय समिती सदस्य प्रा. शिरीष रायते,प्रमुख पाहुणे सेवा निवृत्त प्रा.अविनाश मुंडके,हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अजित बोरा,भाईसथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी,शालेय समिती सदस्य अशोक कानडे, मुख्याध्यापिका रोहिणी फळे, बि.यु.कुलकर्णी,बबन धनवडे, नितीन केने,सुखदेव नागरे,वृषाल एकबोटे, सौ.वैशाली दारवेकर, सौ.अनघा देवचक्के,माहेश्वरी कुलकर्णी आदी उपस्थित होते.

अजित बोरा यांनी वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून शाळेच्या नाव लौकिकात भर घालावी.असे सांगितले.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, हिंदसेवा मंडळ ही शतकोत्तर वाटचाल करणारी संस्था आहे. तसेच श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाने यशस्वीपणे ६१ वर्षे पूर्ण केली आहेत.विद्यार्थ्यांनी शिक्षक व गुरुजनवर्गांचा आदर बाळगावा.चांगले शिक्षण घेऊन शाळेचे नाव उज्वल करावे.

मुंडके सर म्हणाले,वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणारी ही मुलींची शाळा आहे.मुलींची शैक्षणिक व सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी विशेष लक्ष दिले जाते. शाळेतील विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहावे. मोबाईलच्या दुष्परिणामामुळे अनेकांचे मनोबल कमी होत आहे.पर्यावरणाचे रक्षण करावे.व प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक तरी झाड लावण्याचा प्रयत्न करावा.

अशोक कानडे म्हणाले, श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाची प्रगती कौतुकास्पद आहे.हिंद सेवा मंडळाने मुलींच्या कलागुणांचा विकास व्हावा.या हेतूने मुलींची शाळा सुरू केली आहे.या शाळेचा जिल्ह्यात नावलौकिक आहे.शाळा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून मुलींना स्कूल बसची व्यवस्था करण्यात आली आहे.तसेच शालेय साहित्य व गणवेश चे वाटप करण्यात येते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली दारवेकर यांनी केले तर आभार वृषाल एकबोटे यांनी मानले.

## १५ ऑगस्टला पैठणमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण येत्या १५ ऑगस्ट रोजी करण्यात येणार असल्याची घोषणा आमदार विलास भुमरे यांनी केली. अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

आमदार भुमरे म्हणाले की, पैठण शहरात यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती पुतळे उभारण्यात आले आहेत. तसेच हुतात्मा स्मारक परिसरात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि अहिल्याबाई होळकर यांचे पुतळेही उभारण्यात आले आहेत. आता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज बाल उद्यानात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण स्वातंत्र्यदिनी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी अण्णाभाऊ साठे जयंती समितीचे अध्यक्ष लहू गायकवाड, विनोद बांबळे, भूषण कावसांनकर, सुनील हिंगे, गोवर्धन टाक, राजू गायकवाड, नामदेव खरात, अजित पगारे, विष्णू खंडागळे यांच्यासह उत्सव समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मैत्री दिनानिमित्त आयोजित सर्व विमा कंपनी क्रिकेट स्पर्धेत

# न्यू इंडिया अश्युरन्सची पुन्हा एकदा विजयी गरुडझेप!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथे मैत्री दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सर्व विमा कंपनी क्रिकेट स्पर्धेत न्यू इंडिया अश्युरन्स संघाने पुन्हा एकदा आपल्या उत्कृष्ट कामगिरीची छाप पाडत विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेत न्यू इंडिया अश्युरन्स, ओरिएंटल इन्शुरन्स, युनायटेड इंडिया इन्शुरन्स, नॅशनल इन्शुरन्स या चारही सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यांचे संघ, तसेच सर्व चार कंपन्यांचे विमा एजंट आणि सर्व्हेअर संघांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

अंतिम सामन्यात न्यू इंडिया अश्युरन्सने ओरिएंटल इन्शुरन्स (अहिल्यानगर) संघाचा पराभव करून



विजेतेपदावर आपले नाव कोरले. उत्कृष्ट सांघिक खेळ, शिस्त, जिद्द, अचूक नियोजन, आत्मविश्वास आणि विजयाची प्रबळ इच्छाशक्ती यांच्या जोरावर न्यू इंडिया अश्युरन्सने पुन्हा सिद्ध केले की, यश हे केवळ कौशल्याचे नव्हे तर एकजुटीचेही फळ असते.

विजेत्या संघाचे तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडू, एजंट आणि सर्व्हे अर यांचे मनःपूर्वक अभिनंदन! मैत्री, क्रीडाभावना आणि सहकार्याचा संदेश देणारी ही स्पर्धा संस्मरणीय ठरली. ''एकजूट... जिद्द... शिस्त... आणि विजय हीच न्यू इंडियाची ओळख!

# के.जी.महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी उत्साहात साजरी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** के जी महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी श्रद्धापूर्वक व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कला शाखा प्रमुख डॉ. वर्षा कीर्तन यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच कला शाखा प्रमुख डॉ. वर्षा कीर्तने यांनी आपले मनोगत वक्त केले त्यात त्यांनी लोक शाहीर आण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या कार्याचा गौरव करत समाजप्रबोधन, शिक्षण, स्वातंत्र्यलढा आणि सामाजिक समतेसाठी दिलेल्या योगदानाची माहिती सांगितली.यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रोहिणी क्षीरसागर यांनी केले तसेच आभार प्रदर्शन प्रा. स्नेहल बोरावके यांनी केले.

कार्यक्रमास प्रा. योगेश चाकोते आणि सौ हर्षाली रासकर हे उपस्थित होते.

# ५ ऑगस्टला रंगणार 'प्यार दिवाना होता है' गीतमैफल

'किशोर कुमार सन्मित्र पुरस्कार' डॉ. अभिजीत पाठक यांना प्रदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



स्व. किशोरकुमार | अजय दगडे | डॉ. अभिजीत पाठक

**अहिल्यानगर–** सदाबहार गायक किशोर कुमार यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त किशोरकुमार फॅन क्लब, अहिल्यानगर यांच्या वतीने पोलाद स्टील व विंटेज हिल्स यांच्या सहकार्याने बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी 'प्यार दिवाना होता है' या विशेष गीतमैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सावेडी येथील माऊली सभागृहात सायंकाळी ६.३० ते रात्री ९.०० या वेळेत होणार असून संगीतप्रेमींसाठी हा सुरेल पर्वणी ठरणार आहे, अशी माहिती किशोरकुमार फॅन क्लबचे अमोल खोले यांनी दिली.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी मा. आमदार संग्रामभैय्या जगताप, शिल्पकार प्रमोद कांबळे, पोलाद स्टीलचे अध्यक्ष जयेश मेहता, विंटेज हिल्सचे संजोग मुथा, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे सुमितदादा कोल्हे, डॉ. बापूसाहेब कांडेकर, माजी नगरसेवक अविनाश घुले, चे अध्यक्ष अभिजित देवी, आशिष भाबडा, आर्किटेक्ट प्रल्हाद जोशी, दिनेश गोपलानी, कुणाल डुंगरवाल, डॉ. हर्षवर्धन तनवर, डॉ. मुग्धा तनवर, हेमंत कराळे, डॉ. सुलभा पवार, डॉ. स्मिता पटारे, डॉ. दमण काशीद, राकेश गांधी, सचिन भुतारे, मनोज चोपडा, सुरज नन्नवरे, चेतन भंडारी, किरण गवते, भूषण ओस्तवाल, अभिषेक शेलार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

गेल्या १९ वर्षांपासून किशोरकुमार फॅन क्लबच्या माध्यमातून रसिकांसाठी किशोरकुमार यांच्या अजरामर गीतांची मैफल आयोजित केली जात आहे. यंदाच्या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक अजय दगडे आणि पुण्यातील सुप्रसिद्ध गायिका राधिका अत्रे किशोरकुमार यांची लोकप्रिय गीते सादर करणार आहेत.

या गीतमैफिलीत अहिल्यानगर, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित वादक कलाकार दिलावर शेख, अमन सय्यद, अजित गुंदेचा, ललित भूमकर, अजय साळवे, महेश गुरव, हार्दिक रावल, संजय आठवले, अमित साळवे, श्रीकांत गडकरी आणि रोहित कटारे हे सहभागी होणार आहेत. कार्यक्रमादरम्यान दरवर्षीप्रमाणे सुप्रसिद्ध शिल्पकार प्रमोद कांबळे हे किशोरकुमार यांचे लाईव्ह चित्र रेखाटन सादर करणार आहेत.

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य, शाहिरी आणि सामाजिक विचार आजही प्रेरणादायी – आनंद लोखंडे

वीर लहुजी यंग ब्रिगेड प्रतिष्ठानतर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वीर लहुजी यंग ब्रिगेड प्रतिष्ठान यांच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि परिवर्तनवादी कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना आनंद लोखंडे म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या प्रभावी लेखणी आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजातील वंचित, कष्टकरी, श्रमिक आणि शोषित घटकांचा आवाज बुलंद केला. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे सामाजिक विषमता, अन्याय आणि शोषणाविरोधात जनजागृती घडवून आणली. महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीत, सामाजिक क्रांतीत तसेच श्रमिकांच्या हक्कांसाठी आणि वंचित समाजाच्या हितरक्षणासाठी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आणि नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहेत.

ते पुढे म्हणाले की, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजहितासाठी कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

यावेळी वीर लहुजी यंग ब्रिगेड प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गणेश अरुण घोरपडे, पैलवान सुनील भावर, आनंद लोखंडे, विठ्ठल उमाप, पंडित वाघमारे, श्रीकांत घोरपडे, किरण गुंजाळ, गणेश भालेराव, आकाश पवार, विनोद घोरपडे, कुमार काटे, आकाश नानवरे, सुरेश भालेराव, अनिकेत वराळ तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापुरुषांच्या जयंती सामाजिक बांधिलकी जपत साजऱ्या कराव्यात; गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदतीची गरज – आमदार संग्राम जगताप

## पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त शालेय साहित्य व गणवेश वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सिद्धार्थनगर येथील पंचशील विद्यामंदिर प्राथमिक शाळेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या शुभहस्ते शाळेतील १११ गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. हा उपक्रम सामाजिक कार्यकर्ते पोपटराव पाथरे व श्री घोरपडे मित्र मंडळ यांच्या वतीने राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते होते. यावेळी नगरसेवक निखिल वारे, सुरेश बनसोडे, महित पंजाबी, जय भोसले, सुमेध गायकवाड, जयंत गायकवाड, सुनिल क्षेत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे उज्ज्वल भविष्य आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. शिक्षणामुळेच विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा मिळते. त्यामुळे अशा सामाजिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

ते पुढे म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणी आणि शाहिरीच्या माध्यमातून समाजात समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचा संदेश दिला. त्यांचे विचार आजही युवकांना प्रेरणा देणारे आहेत. प्रत्येकाने त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजासाठी सकारात्मक कार्य केले पाहिजे. आपण समाजात वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते, या भावनेतून वाढदिवस, सण–उत्सव तसेच महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी सामाजिक बांधिलकी जपत साजऱ्या केल्या तर त्याचे समाजाला मोठे योगदान मिळेल.

शाळेचे मुख्याध्यापक शेखर उंडे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, गेल्या १० ते १२ वर्षांपासून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरू आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत असून पालकांनाही मोठा आधार मिळत आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश उकर्डे, मंगला गोसावी, ज्योती वांगणे, वंदना शिरसाठ, लुमाजी साबळे आणि सोनाली तिवारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

# दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीत गुरुपौर्णिमा आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सुलोचना सप्तर्षी पूर्व प्राथमिक विभाग , वि.ल.कुलकर्णी प्राथमिक शाळा व प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या सर्व विभागांची उत्साह पूर्ण वातावरणात एकत्रितपणे गुरुपौर्णिमा व लोकमान्य टिळक पुण्यातिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली.

शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सरस्वती वंदनेने आणि स्वागत गीताने मंगलमय झालेल्या वातावरणात सर्व गुरुजनांचा सन्मान करण्यात आला.

संस्थेच्या मान्यवर पदाधिकारी श्रीमती रेखे मॅडम, श्री.चंद्रशेखर कुलकर्णी,श्री.किरण वैकर श्री. उमेशजी रेखे , श्री.महेशजी रेखे श्री.उदयकुमार भणगे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी गुरूंचे समाज जीवनातील स्थान अधोरेखित करत प्रथम गुरू आई – वडील आणि शिक्षकांचे आदर, शिस्त आणि संस्काराचे महत्त्व पटवून दिले.पुस्तकातून फक्त माहिती मिळेल परंतु ज्ञान मिळवण्यासाठी गुरु हवेच असे मत त्यांनी मांडले. आणि म्हणूनच गुरुजनांचा आदर सन्मान नित्य क्रमाने करण्याचा मोलाचा संदेश पाहुण्यांनी दिला.

या प्रसंगी गुरु महिमा सांगणारी तसेच लो. टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी आदर व्यक्त करणारी भाषणे सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमात सर्व विभागांचे मुख्याध्यापक, शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

# जिल्हा परिषद सेवानिवृत्त शिक्षक, अधिकारी, कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी वसंत ताकटे तर कार्याध्यक्षपदी बजरंग काळे यांची फेरनिवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** जि.प. प्रशाला पैठण येथे सेवानिवृत्त संघटनेचे जिल्हाध्यक्ष तात्याराव चव्हाण, राज्य संघटक सुभाष शिंदे, विभागीय अध्यक्ष गणेश राठोड, जिल्हा पदाधिकारी कडुबाळ फासाटे, सी.एम. रमणे, प्रकाश लोखंडे, सुर्यकांत बढे, घुगे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत पैठण तालुका कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये पैठण तालुका सेवानिवृत्त संघटनेच्या अध्यक्षपदी वसंत ताकटे, कार्याध्यक्ष पदी बजरंग काळे, सचिव विठ्ठल सावंत, सहसचिव ज्ञानदेव शिरवत, उपाध्यक्ष शिवाजी महालकर आणि पंढरीनाथ मोगल, कोषाध्यक्ष मुक्तार शेख, सहकार्याध्यक्ष उमेश सोनवणे, संघटक पदी मिलिंद रोडे, सुभाष दुधे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक अंकुश गाढे, समशेर पठाण, फैय्याज शेख आदी उपस्थित होते.

# जयकवाडी ९० टक्के भरताच पाण्याचा विसर्ग; कोणत्याही क्षणी उघडणार पहिली पाच दरवाजे, प्रशासन अलर्ट मोडवर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** मराठवाड्याची जीवनवाहिनी असलेल्या जयकवाडी धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढत असून सोमवारी दुपारपर्यंत धरणात ८४.५४ टक्के जिवंत पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सध्या २६०३२ क्युसेक पाण्याची आवक सुरू असून धरणाची पाणीपातळी सातत्याने वाढत आहे.

वरच्या धरणांतून येणाऱ्या वाढत्या पाण्याचा विचार करून पाटबंधारे विभागाने जयकवाडी धरण ९० टक्के भरताच नियंत्रित पद्धतीने पाण्याचा विसर्ग करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार धरणाच्या २७ पैकी पहिल्या पाच दरवाजांमधून कोणत्याही क्षणी पाणी सोडण्याची तयारी पूर्ण करण्यात आली असून धरण नियंत्रण कक्षातून परिस्थितीवर चोवीस तास लक्ष ठेवले जात आहे.

विसर्गाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन, महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि पाटबंधारे विभाग अलर्ट मोडवर आले आहेत. गोदावरी नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन नदीकाठच्या गावांतील ग्रामपंचायतींना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे, जनावरे व शेतीची अवजारे सुरक्षित ठिकाणी हलवावीत तसेच प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, पैठण नगर परिषदेने शहरात भोंगा फिरवून गोदावरी नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यास सुरुवात केली आहे. नदीकाठी अनावश्यक गर्दी करू नये, पाण्यात उतरू नये आणि कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ प्रशासनाकडून मिळणाऱ्या अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पाटबंधारे विभागाने स्पष्ट केले की, धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्यानंतर पूरसदृश परिस्थितीनिर्माण होणार नसली तरी गोदावरी नदीच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ होणार आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी अधिक सतर्कता बाळगून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# थोर समाज सुधारकांचे सामाजिक साहित्यिक योगदान आजही प्रेरक – डॉ. राजा ठाकूर

## अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती पुस्तक प्रदर्शनाने संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वातंत्र्यपूर्व काळात अतिशय प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी अनुभवातून लिहिलेले प्रबोधनात्मक साहित्य तसेच लोकमान्य टिळक यांचे सामाजिक ऐक्य आणि देशप्रेम जागृत करणारे कृतीयुक्त विचार व साहित्य आजही समाजाला प्रेरणादायी असल्याचे उद्‌गार जिल्हा वाचनालयचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर यांनी काढले.



जिल्हा वाचनालयात अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त आयोजित पुस्तक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते .यावेळी प्रदर्शनाचे उद्घाटन वाचनालयाचे संचालक संजय चोपडा, वाचनालयाचे कार्यवाह विक्रम राठोड,संचालिका शिल्पा रसाळ, किरण अग्रवाल ग्रंथपाल अमोल इतापे सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताला, पल्लवी कुकडवाल, वर्षा जोशी ,संजय गाडेकर, आशिष तरोटे ,ओम केदारे तसेच वाचक कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी संजय चोपडा यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य कृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालक महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली ''लेखन प्रेरणा दिनानिमित्त ''लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचनालयाचे वाचक राजेश भालेराव यांनी वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिल्पा रसाळ यांनी केले .संचालक संजय चोपडा यांनी या उपक्रमानिमित्त वाचकांना साहित्याचे वितरण केले. आभार ग्रंथपाल अमोल इथापे यांनी मानले.

### आमचा विरोध समाजाला नाही, सरकारच्या निर्णयाला

# कोपरगावात आंबेडकरी समाजाचा उपवर्गीकरणाच्या विरोधात मोर्चा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** अनुसूचित जातीतील आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात राज्यभरात सुरू असलेल्या आंदोलनाला सोमवारी कोपरगावातही मोठा प्रतिसाद मिळाला. समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विराट जनआक्रोश महामोर्चात कोपरगाव शहर, तालुका तसेच जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे या महामोर्चात केवळ आंबेडकरी समाजच नव्हे, तर विविध समाजघटक, सामाजिक संघटना, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि संविधानावर श्रद्धा असलेल्या नागरिकांचीही मोठी उपस्थिती होती. त्यामुळे संपूर्ण शहरात सामाजिक ऐक्याचे आणि संविधानावरील विश्वासाचे चित्र पाहायला मिळाले.




महामोर्चाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर हातात निळे झेंडे, संविधानाच्या प्रती आणि विविध मागण्यांचे फलक घेऊन आंदोलनकर्त्यांनी शहरातील प्रमुख मार्गावरून शिस्तबद्ध रॅली काढली. ''जय भीम'', ''संविधान बचाव'', ''आरक्षण वाचवा'' आणि ''उपवर्गीकरण रद्द करा'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

तहसील कार्यालयासमोर झालेल्या सभेत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्यानंतर विविध वक्त्यांनी आपली भूमिका मांडताना स्पष्ट केले की, या आंदोलनाचा विरोध कोणत्याही समाजाला नसून, शासनाने घेतलेल्या उपवर्गीकरणाच्या निर्णयाला आहे. मातंग समाजासह अनुसूचित जातीतील सर्व समाजघटक हे आपलेच बांधव असून, समाजात फूट न पडता संविधानाने दिलेले समान अधिकार अबाधित राहावेत, हीच या आंदोलनामागील भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. या महामोर्चात चर्मकार समाज, बुरुड समाजासह विविध सामाजिक संघटनांनी सहभाग घेतला. संपूर्ण कार्यक्रम शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडण्यासाठी समता सैनिक दलाने उत्कृष्ट नियोजन केले. स्वयंसेवकांनी मोर्चाचे व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण, सहभागी नागरिकांना मार्गदर्शन आणि संपूर्ण कार्यक्रमात शिस्त राखण्यासाठी केलेल्या कार्याचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

सभेच्या शेवटी शासनाच्या नावे तयार करण्यात आलेले निवेदन तहसील प्रशासनाकडे सादर करण्यात आले. त्यामध्ये अनुसूचित जातीतील आरक्षणाचे उपवर्गीकरण रद्द करावे, संविधानाने दिलेल्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचे संरक्षण करावे आणि समाजात तेढ निर्माण होईल असे कोणतेही निर्णय घेऊ नयेत, अशी मागणी करण्यात आली.

(पान १ वरून)

## संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकारी कार्यालय समोर ठिय्या आंदोलन

असे मत संभाजी ब्रिगेड ने व्यक्त केले आहे. महाराष्ट्र सरकारने अनिवार्य करून हजारो शिक्षकांची पिळवणूक केली आहे. या शिक्षकांनी सेवेत येताना आवश्यक पात्रता पूर्ण केली असून यांच्या कडे शिक्षणं पूर्ण करून लाखो विद्यार्थी आज , इंजिनिअर , डॉक्टर ,वकील झाले आहेत हे वास्तव असून गुणवत्ता वाढीच्या नावाखाली सरकार आडमुठी भूमिका घेत आहे हे तमाम शिक्षक वर्गास वेठीस धरतं आहे हे चुकीचं धोरणं अवलंबत आहे याला संभाजी ब्रिगेड ने तीव्र विरोध दर्शवला आहे. या आंदोलनात संभाजी ब्रिगेड प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी अण्णासाहेब सावंत यांनी या पुढे एकही परीक्षा ऑनलाईन घेऊ दिली जाणारं नाही, प्रसंगी कोणत्याही स्तराला जाऊन आंदोलन करण्याची वेळ आली तर मागे हटणार नाही व विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ देणार नाही असा इशारा दिला.

या आंदोलनाचे नेतृत्व संभाजी ब्रिगेड चे जिल्हा अध्यक्ष राजेश परकाळे यांनी केले. या पुढे परीक्षा कायमस्वरूपी रद्द केली नाही तर सरकारला जी भाषा समजते त्या आंदोलनाचा वापर करून सरकारच डोक ठिकाणावर आणलं जाईल असा सज्जड इशारा जिल्हा अध्यक्ष राजेश परकाळे यांनी दिला. या आंदोलनात संभाजी ब्रिगेड चे इंजि. शाम जरे, दिलीप वाळुंज, सद्दाम शेख, विठ्ठल देठे, सचिन काकडे, महेश दानवे, प्रशांत कांबळे, योगेश बोरकर, शशी दरेकर, वैभव लालगे, अवि मेढे, संदीप मांढरे, दादा ठोंबरे, शशांक सुरवसे, अच्युत गाडे यांच्यासह विद्यार्थी समृद्धी सासवडे, तनुजा सायबर , ऋतुजा गुंड, प्रतीक्षा अमृते, अक्षदा गुंड, अशोक गुंड, बिभीषण सासवडे, अशोक फाटे, गणेश खुळे, सुजित हजारे, अजित हजारे, प्रतीक फिसके, दीपक सदाफुले, ओम जराडे, महेश कांबळे, जयदीप बनकर हिच्या सह मोठ्या संख्येने उपस्थित होते. संभाजी ब्रिगेडचे युवक अध्यक्ष अमोल शेळके, अरविंद गेरांगे हे उपस्थित होते.

## चांदा येथील बनावट दारूच्या कारखान्याचा पर्दाफाश; पावणेबारा लाखांचा मुद्देमाल जप्त

चांदा येथे बनावट विदेशी दारूचा कारखाना सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्या आधारे पथकाने चांदा शिवारातील संदीप गायकवाड याच्या घराशेजारील पत्र्याच्या शेडवर छापा टाकला असता, तेथे विविध नामांकित कंपन्यांच्या बाटल्यांमध्ये बनावट दारू भरून, ती सील करून हॉटेलमध्ये विकली जात असल्याचे उघडकीस आले. पोलिसांना पाहून संदीप गायकवाड पळून जाण्यात यशस्वी झाला; मात्र हुंदाई कारमध्ये दारूचे बॉक्स भरताना एका १७ वर्षीय विधिसंघर्षित बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलीस अंमलदार भगवान सानप यांच्या फिर्यादीवरून सोनई पोलीस ठाण्यात ताब्यात घेतलेला विधिसंघर्षित बालक, तसेच संदीप शिवाजी गायकवाड, राजू जावळे व एक अज्ञात इसम अशांवर भारतीय न्याय संहिता कलम १२३, ३१८ (४), ३३६ (३), ३४० (२) आणि महाराष्ट्र दारूबंदी कायदा ६५ (अ, ब, ड, ई, फ).गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विदेशी दारूच्या बाटल्या व कार जप्त

छाप्यादरम्यान बनावट विदेशी दारूच्या हजारो बाटल्या (किंमत ४ लाख १६ हजार ९३५), –४८––५४४७ या क्रमांकाची, हुंदाई ओरा कार (किंमत ७ लाख ५० हजार), बाटल्या सील करण्याचे प्लास्टिक बूच, रसायने व इतर साहित्य असा एकूण ११ लाख ७२ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पथकात यांचा सहभाग

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशान्वये एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक संदीप दरवडे व पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, विजय पवार, अरूण गांगुर्डे, अशोक लिपणे, भगवान सानप व भगवान धुळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

(पान १ वरून)

## पाथर्डीत एलसीबीचे अवैध गुटख्यावर छापे

ओंकार राजेंद्र उधारे (वय १९, रा. कसबा पेठ, पाथर्डी) यांना ताब्यात घेण्यात आले असून, पाचवा आरोपी गणेश सुनील शिंदे (रा. कसबा पेठ, पाथर्डी) फरार झाला आहे. पाचही आरोपींविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता मधील विविध कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच पथकातील अभिजीत अरकल, राहुल डोके, अमोल आजबे, रणजीत जाधव, योगेश कर्डीले, रमीजराजा आतार व सतीष भवर यांनी ही कारवाई केली.

## नगर शहरातील सराईतांची टोळी एक वर्षासाठी हद्दपार

संबंधित टोळीविरुद्ध कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक गंभीर गुन्हे नोंद आहेत. यामध्ये गैरकायद्याची मंडळी जमवून घातक शस्त्रांसह खुनाचा प्रयत्न करणे, दरोडा टाकणे, अनुसूचित जाती–जमातीच्या व्यक्तीस जातीवाचक शिवीगाळ करून गंभीर दुखापत करणे, अल्पवयीन मुलीचा विनयभंग, बलात्कार, दोन समाजात तेढ निर्माण करून द्वेष पसरवणे आणि यापूर्वीच्या तडीपारी आदेशाचा भंग करणे यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे.कोतवालीचे पोलीस निरीक्षक यांनी या टोळीविरोधात तडीपारीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यावर सखोल चौकशी करून ही कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस प्रशासनाचा इशारा

नगर जिल्ह्यात संघटित गुन्हेगारी, गोवंशीय कायद्याचे उल्लंघन, हत्यार कायदा आणि वाळू चोरी करणाऱ्या इतर गुन्हेगारांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. वारंवार कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्या अशा अन्य टोळ्यांवरही लवकरच हद्दपारीची कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस अधीक्षकांनी दिला आहे.